# अमृतमय गुरुगाथा : खंड २
# गुरु प.पू. भक्तराज महाराज
# यांच्या अगम्य लीला आणि शिकवण
# (गुरुंच्या सान्निध्यातील अविस्मरणीय प्रसंगांसह )

## विषयसूची


卐 सद्‌गुरु प.पू. भक्तराज महाराज यांचा संक्षिप्त परिचय ६

卐 लेखिकेचा परिचय ८

卐 मनोगत ९

卐 ‘संतांचे एखाद्याला शिव्या देणे किंवा ओरडणे’ या मागचा भावार्थ ! ११


## अनुक्रमणिका


१. प.पू. भक्तराज महाराज यांनी शिष्य डॉ. आठवले यांचे नामकरण न करणे आणि ‘डॉक्टर हे ‘डॉक्टर’ म्हणूनच ओळखले जातील’, असे सांगण्यामागचे कारण १२

२. प.पू. भक्तराज महाराज यांनी डॉ. आठवले यांना सर्वांवर निरपेक्ष प्रेम करण्यास सांगणे १३

३. प.पू. भक्तराज महाराज यांचा पत्नीवरील प्रीतीचा अनुभवलेला जगावेगळा अजब आविष्कार ! १४

४. प.पू. भक्तराज महाराज यांचे अनुभवलेले एक वेगळे रूप ! १७

५. दोन वेगवेगळ्या प्रसंगांत प.पू. भक्तराज महाराज यांचे वागणे १८

६. भक्तांकडून सेवा करवून घेणारे प.पू. भक्तराज महाराज २०

७. प.पू. भक्तराज महाराज यांचे सर्वत्र समानतेने पहाणे २३

८. अनेक सिद्धी प्राप्त असतांनाही त्यांचा क्वचितच वापर करणारे,

भक्तांसाठी झटणारे आणि त्यांना आनंद देणारे भक्तवत्सल प.पू. भक्तराज महाराज ! २६
९. प.पू. भक्तराज महाराज यांच्या संदर्भातील एक आगळावेगळा अनुभव ! ३०
१०. प.पू. भक्तराज महाराज यांचा अनुभवलेला द्रष्टेपणा ! ३१
११. प.पू. भक्तराज महाराज यांची भविष्यातील गोष्टी जाणण्याची अचाट क्षमता ! ३२
१२. प.पू. भक्तराज महाराज यांची अनुभवलेली सर्वज्ञता ! ३४
१३. प.पू. भक्तराज महाराज यांच्या अनुभवलेल्या काही लीला ! ४६
१४. प.पू. भक्तराज महाराज यांच्या संदर्भातील काही अविस्मरणीय प्रसंग ६१
१५. प.पू. भक्तराज महाराज यांचे भक्त श्री. अंजनीकुमार यांच्याकडील काही गंमतीजमती ! ७६
१६. प.पू. भक्तराज महाराज यांनी काही भक्तांची गंमतीशीर नावे ठेवणे आणि त्यांना त्या नावांनी हाक मारणे ७९
१७. प.पू. भक्तराज महाराज यांच्या सहवासात वठवायला लागलेल्या अनेक भूमिका ! ७९
१८. जव्हार येथील काही किस्से ! ८३
१९. मोरचुंडी येथील काही किस्से ! ८७
२०. प.पू. भक्तराज महाराज यांच्या समवेत इतर संतांच्या आश्रमांना दिलेल्या भेटी ! ९२
२१. प.पू. भक्तराज महाराज यांचे बोलके छायाचित्र ! ९३
२२. प.पू. भक्तराज महाराज आणि प.पू. रामानंद महाराज यांच्यातील अनोखी अन् अतूट प्रीती ! ९४
२३. प.पू. भक्तराज महाराज यांच्या संदर्भातील एक किस्सा ९७
२४. प.पू. भक्तराज महाराज यांची अनमोल शिकवण ! ९७

## मनोगत

**१. प.पू. भक्तराज महाराज यांच्याविषयी भक्तांशी बोलतांना त्यांनी 'कुंदाताईंची 'गुरुगीता' चालली आहे', असे म्हणणे :** 'एकदा इंदूर आश्रमातल्या गणेश सभागृहाच्या बाहेरच्या चौकात आम्ही बायका बोलत बसलो होतो. तेव्हा प.पू. भक्तराज महाराज (प.पू. बाबा) कुणाचा तरी हात धरून बाहेर चालले होते. आमच्या समोरून जाता जाता माझ्याकडे बघून ते म्हणाले, ''कुंदाताईंची 'गुरुगीता' चालली आहे.'' खरोखरच त्या वेळी मी त्या सगळ्यांशी प.पू. बाबांबद्दलच बोलत होते. तेव्हा 'पुढे भविष्यात खरोखरच 'गुरुगीता' (अमृतमय गुरुगाथा) लिहायची वेळ येईल', असे मला स्वप्नातसुद्धा वाटले नव्हते.

**२. मुंबईच्या भक्तांशी बोलतांना प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांच्याविषयी आठवणी निघणे, भक्तांनी 'हे सर्व लिहून काढा', असे सांगणे अन् त्या वेळी ते फारसे मनावर न घेणे :** आमचा मुंबईचा जो गट आहे, तो कुठल्याही निमित्ताने एकत्र आला की, हमखास प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांच्या आठवणी निघायच्या. मी प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांच्याविषयी जे अनुभवले, त्याविषयी मी त्यांना बरेच काही सांगायचे. तेव्हा त्यातले काही जण मला म्हणायचे, ''तुम्ही हे सगळे लिहून का काढत नाही ? सगळ्यांनाच त्याचा आनंद घेता येईल''; पण तेव्हा मी ते फारसे मनावर घेतले नाही.

**३. गोव्याला आल्यावर डॉक्टरांशी बोलतांना प.पू. बाबांच्या आठवणी निघणे आणि त्यांनी 'हा इतिहास असल्याने लिहून काढा', असे सांगणे :** डॉक्टरांच्या आजारपणाच्या निमित्ताने दळणवळण बंदीच्या काळात मला गोव्याला यावे लागले. डॉक्टरांशी बोलतांना प.पू. बाबांच्या आठवणी निघायच्या. त्या वेळी मला जे आठवायचे, ते मी त्यांना सांगायचे. तेव्हा डॉक्टर मला म्हणायचे, ''हा तर इतिहास आहे. हे सगळे लिहून काढा. आपल्या अध्यात्माच्या मार्गावरील वाटचालीबद्दलही लिहा.''

**४. सगळे प्रसंग सलग आठवत नसल्याने साधनेच्या वाटचालीविषयी लिहिणे अवघड वाटणे, प.पू. बाबांना शरण जाऊन प्रार्थना केल्यावर ३० – ३५ वर्षांतला सगळा घटनाक्रम आठवू लागणे आणि प.पू. बाबांनीच 'गुरुगीता' लिहून घेतल्याचे जाणवणे :** मला हे थोडेसे अवघड काम वाटले; कारण वाटचालीबद्दल लिहायचे, तर सगळे प्रसंग सलग आठवले पाहिजेत. मला मधले मधले प्रसंगच आठवायचे. शेवटी मी प.पू. बाबांनाच शरण गेले आणि त्यांना विनंती केली, 'तुम्हीच मला सगळी आठवण करून द्या.' आश्चर्य म्हणजे मला मागच्या ३० – ३५ वर्षांतला सगळा घटनाक्रम आठवू लागला. शेवटी प.पू. बाबांनी माझ्याकडून 'गुरुगीता' लिहून घेतली. मी काही साहित्यिक नाही. 'बोलवितो मज नंदाचा नंदन' या भावाने माझ्याकडून हे लिखाण झाले आहे. तरी ते गोड मानून घ्या. 'चांगले आहे, ते माझ्या गुरूंचे आहे आणि चुका झाल्या असतील, तर त्या माझ्या आहेत', असे समजून वाचन करा. लिखाणात काही त्रुटी असू शकतील. त्याबद्दल क्षमस्व !

**५. प.पू. बाबांच्या आठवणीची ही भेट कृतज्ञताभावाने प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांच्या चरणी अर्पण ! :** प.पू. बाबांच्या लीला अगाध आणि अमाप आहेत. त्यांतले माझ्या हाताला लागलेले अल्पसे कण मी वेचले आणि आपल्यापुढे सादर केले. माझ्यासाठी जे प्रेरणादायी ठरले, ते इतरांनाही मिळावे; म्हणून हा छोटासा प्रयत्न ! ही छोटीशी भेट कृतज्ञताभावाने प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांच्या चरणी अर्पण करते. 'प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांचे प्रेम आणि कृपाशीर्वाद आम्हा दोघांना, त्यांचे सगळे शिष्य, भक्त आणि साधक यांना मिळो', हीच ईश्वरचरणी प्रार्थना !'

**– डॉ. (सौ.) कुंदा जयंत आठवले, गोवा (३.१२.२०२०)**

**मी कुणाचा गुरु नाही; पण शिष्य केल्याविना सोडणार नाही.**

**– प.पू. भक्तराज महाराज** F (DrF-Ku-L + BMT-PR 6)